**अटी व शर्ती -**

1. सदर निविदेचे दर कार्यारंभ आदेशा पासून एक वर्षापर्यंत वैध राहतील. याबाबत मधील कालावधीत शासनाकडून दरात कपात झाल्यास त्यानुसार अथवा शासनाकडून प्राप्त झालेल्या निर्देशानुसार बदल होईल.

2. व्यावसायिक संस्था/ स्वयंसेवी संस्था यांनी विभाग/उपविभाग यांचे प्राधान्य क्रमानुसार प्रस्ताव सादर करावेत.

3. जागेची उपलब्धता / परवाने यांची खात्री करुन प्रस्ताव करावेत. प्रस्ताव तांत्रिक व प्रशासकिय मंजुरी मिळेपर्यंत त्यामध्ये होणाऱ्या बदलानुसार प्रस्तावातील बदल आहे त्याच किंमतीत करावा लागेल.

4. सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) ची तपासणी करुन दिलेल्या नमुन्यानुसार व बरोबर असल्याची खात्री करून वरिष्ठ कार्यालयाच्या परवानगीने व निर्देशानुसार,एम्पॅनेलमेंट व्यावसायिक संस्था / स्वयंसेवी संस्था यांनी सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रकीय प्रस्ताव तयार करणे, आराखडे तयार करणे, पर्यवेक्षण करणे व तांत्रिक सल्ला / सहाय्य प्रदान करणे याबाबी करिता जिल्ह्यास मैला गाळ व्यवस्थापन,करिता प्रत्येकी अनुज्ञेय असलेल्या निधीच्या 5% किंवा रुपये 1,00,000/- (अक्षरी - रुपये,एक लक्ष फक्त ) यापैकी जी कमी असेल त्या रकमेच्या मर्यादेपर्यंत (तथापि सदरची रक्कम रुपये 1,00,000/- रुपये एक लक्ष फक्त पेक्षा जास्त नसावी) व्यावसायिक संस्था / स्वयंसेवी संस्था यांना शुल्क म्हणून शासनस्तरावरुन संबंधीत प्रकल्पासाठी निधी उपलब्ध झाले नंतरच खालीलप्रमाणे अदा करण्यात येईल.

| अ.क्र. | EOI संस्था कामाचे टप्पे | प्रत्यक्ष केलेल्या कामासाठी EOI संस्था शुल्क अदायगी टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | सर्वेक्षण, अंदाजपत्रके व आराखडे तयार करणे. | तांत्रिक व प्रशासकिय मान्यता प्रदान केल्यानंतर एकूण अनुज्ञेय व्यावसायिक / EOI संस्था शुल्काच्या15% रक्कम |
| 2 | कामाच्या कंत्राटदाराकडून उपांगाच्या कामाचे पर्यवेक्षण करून काम पूर्ण करुन घेणे | अनुज्ञेय व्यावसायिक / EOI संस्था शुल्काच्या70 % रक्कम |
| 3 | कामाची समाधानकारक देखभाल व दुरुस्ती. | अनुज्ञेय व्यावसायिक / EOI संस्था शुल्काच्या15% रक्कम ( एकूण 5 वर्षात समान हप्त्यात विभागून ) |

5. काम करित असताना केंद्र शासन व राज्य शासनाने वेळोवेळी पारीत केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार काम करणे बंधनकारक आहे.

Scanned with OKEN Scanner

6. आदेशाच्या तारखेपासून 15 दिवसांत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करुन संबंधीत उपअभियंता ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग यांचेकडे सादर करणे बंधनकारक आहे.

7. सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेस विलंब झाल्यास आपण दंडास पात्र राहतील. (दंड किती आकारावयाचा याबाबत मा.मु.का.अ. यांचे आदेश अंतिम राहतील).

8. अर्थिक वर्ष संपल्या नंतर आवश्यक असल्यास कामांना मुदतवाढ देणे किंवा कामांचे नवीन दरपत्रक DPR मागविणे ही बाब उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पावस्व) यांच्या अधिकारक्षेत्रात राहील.

9. वेळोवेळी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा.व स्व.) व कार्यकारी अभियंता ( ग्रा.पा.पु.) तसेच वरिष्ठ कार्यालयाने दिलेल्या लेखी व तोंडी सुचनेनुसार कार्यवाही करणेची आहे.

10. निवड केलेल्या संस्थेने संबंधीत ग्रामपंचायतीशी १००रु च्या स्टॅम्पवर सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) कामाबाबत करार करावा.

11. निवड केलेल्या संस्थांचे करार कोणतेही कारण न देता रद्द करणेचे अधिकार मा.मुख्यकार्यकारी अधिकारी यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत.

12. सदरच्या एम्पॅनेलमेंट व्यावसायिक संस्था / स्वयंसेवी संस्था यांना मैला गाळ व्यवस्थापन प्रकल्पाचे सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रकीय प्रस्ताव तयार करणे, आराखडे तयार करणे, पर्यवेक्षण करणे व तांत्रिक सल्ला/ सहाय्य प्रदान करणे याबाबींचा अनुभव असणे आवश्यक आहे.

13. सदर संस्थेकडे या क्षेत्रातील सखोल अनुभव असणा-या व तांत्रिकदृष्ट्या सक्षम अभियंता असणे आवश्यक आहे. याबाबतची माहिती सादर करणे आवश्यक राहील.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद कोल्हापूर

Scanned with OKEN Scanner